रविकांत तुपकर व कार्यकर्त्यांची निर्दोष मुक्तता >> पान 2

अतिवृष्टी आणि रोगट्यामुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान, शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा >> पान 3

बोहल्यावर चढवून लाखोंचा गंडा घालणारी टोळी गजाआड >> पान 4

**सुविचार**

नेहमी प्रयत्नशील राहा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 43 ■ बुधवार, दि. 03 सप्टेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



वरुण धवनच्या रोमँटिक गाण्यावर मराठी अभिनेत्रीचं सुंदर सादरीकरण!

आतील पान

# संघर्षयोद्धा विजयी
# मनोज जरांगेंनी उपोषण सोडले; उपोषणामुळे प्रकृती नाजूक

**मुंबई/प्रतिनिधी : मनोज जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानावरील उपोषण संपल्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने त्यांच्या जवळपास सर्वच मागण्या मान्य केल्या आहेत. त्यासंबंधीचे जीआरही सरकारने काढले आहे. त्यामुळे जरांगेंनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हातून लिंबू सरबत घेऊन आपले उपोषण सोडले. यामुळे गत शुक्रवारपासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा तिढा यशस्वीपणे सुटला आहे.**



दरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण सोडले आहे. त्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर आरक्षणाची लढाई जिंकल्याचे समाधान पाहायला मिळाले. त्यांनी गुलाल उधळून हा आनंद साजरा केला. तसेच आंदोलकांनी सावकाशपणे आपल्या गावी जाण्याचे आवाहन केले आहे. तसेच रात्री ९ पर्यंत मुंबई रिकामी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मनोज जरांगे पाटील यांनी हैदराबाद गॅझिटिरच्या अंमलबजावणीची महत्त्वाची मागणी केली होती. राज्य सरकारकडून ही मागणी मान्य करण्यात आली आहे. हैदराबाद गॅझिटिरच्या अंमलबजावणी सरकार तातडीने सुरु करणार आहे. त्याचबरोबर मराठा आंदोलनामध्ये मराठा तरुणांवर दाखल झालेले सर्व गुन्हे माफ करण्यात येणार आहे. मराठा आंदोलकांवर सर्व गुन्हे मागे घेणार असल्याचा देखील जीआर काढला जाणार आहे. याचबरोबर कुणबी प्रमाणपत्राबाबत देखील राज्य सरकारकडून निर्णय घेण्यात आला आहे. सरकार ५८ लाख कुणबी नोंदीचा रेकॉर्ड ग्रामपंतायतींवर लावणार आहे.

त्याचबरोबर मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची मराठा आंदोलनात बलिदान दिलेल्या आंदोलकांच्या कुटुंबियांबाबत होती. मराठा आरक्षणाच्या आंदोलमनामध्ये बलिदान दिलेल्या कुटुंबांना सरकार एका आठवड्यात मदत देणार असल्याचे देखील जाहीर करण्यात आले आहे. त्याचबरोबर राज्यपालांच्या स्वाक्षरीने तातडीने मराठा बांधवांच्या या मागणीबाबत ऋ्ठ काढला जाणार आहे. अशा सहा मागण्या मनोज जरांगे पाटील यांच्या मान्य झाल्या आहेत.

## आंदोलकांनी उधळला 'जल्लोषाचा गुलाल'; राज्य सरकारने काढला आरक्षणाचा जीआर काढला



## आजचा जीआर ओबीसींचे आरक्षण संपवणारा – लक्ष्मण हाके



सरकारने काढलेलाप जीआर संविधान विरोधी आहे, ओबीसी समाजाचे आरक्षण संपवणारा हा निर्णय आहे, असा आरोप ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केला. विरोधी निर्णय येऊन सुद्धा शासनाने सुप्रीम कोर्टांच्या गाईडलाईन, कोर्टात कंटेम्प करण्याचे काम केलेले आहे. मुळात शिंदे समितीचा अहवाल पक्षपाती करणारा आहे, असा आरोपही त्यांनी केला. तटस्थ राहून निर्णय घ्यायला हवा होता. या निर्णयामुळे ओबीसी आरक्षण आज संपुष्टात आलेले आहे. सरकार हतबल होते, हतबलते पुढं ओबीसी आरक्षणाच्या नरडीचा घोट घेण्याचे काम सरकारने केले आहे, असे लक्ष्मण हाके म्हणालेत.

## जीआरमध्ये फसवणूक झाल्यास राज्यात एकही मंत्री फिरु देणार नाही, मनोज जरांगे पाटलांचा इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मोठं यश मिळालं आहे. मराठा समितीने हैदराबाद गॅझेट मान्य असल्याचं सांगितलं आहे. त्यानुसार गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना चौकशी करुन कुणबी प्रमाणपत्र देणार असल्याचं उपसमितीने मनोज जरांगे यांच्यासमोर मान्य केलं. यानंतर एका तासात या मागण्यांचा जीआर काढणार असल्याचं सरकारनं मान्य केलं आहे. जर जीआरमध्ये काही फसवणूक झाली तर महाराष्ट्रात एकाही मंत्र्याला फिरु देणार नसल्याचा इशारा मनोज जरांगे पाटीलांनी दिला आहे.

सरकारने तयार केलेला मसुदा मनोज जरांगे पाटील यांना मान्य आहे. त्यामुळं सरकार पुढच्या एका तासात जीआर काढणार असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. जीआर काढण्यासाठी अधिकारी रवाना झाले आहेत. दरम्यान, मनोज जरांगे यांच्यासोबत असलेल्या अभ्यासकांना देखील सरकारनं काढलेला मसुदा मान्य झाला आहे. मसुदा एकदम योग्य असल्याचं अभ्यासकांचं देखील मत आहे. सरकारवर विश्र्वास ठेवा. जर जीआरमध्ये फसवणूक झाली तर महाराष्ट्रात एकपण मंत्री फिरु देणार नसल्याचे जरांगे पाटील म्हणाले. जीआरमध्ये काही चूक झाली तर तो जीआर फेकून देऊ असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

हैद्राबाद गॅजेट लागू करण्याच्या मागणीस उपसमितीने मान्यता दिली आहे, याचा अर्थ हैद्राबाद गॅजेटची अंमलबजावणी करण्याची सूचना उपसमितीकडून देण्यात येईल. सातारा गॅजेटबद्दल आपण मागणी केली होती, म्हणजे पश्र्चिम महाराष्ट्र मराठा यामध्ये येतो. औंध आणि सातारा मध्ये काही त्रुटी आहेत. पुढील १५ दिवसात कायदेशीर त्रुटीचा अभ्यास करून अंमलबाजवणी केली जाईल, असे शासनाने म्हटले आहे. मराठा आणि कुणबी आहे असा जीआर काढा, मराठा कुणबी एकच हा जीआर जारी करा. त्यावर, ते म्हणाले किचकट आहे त्याला वेळ लागेल म्हणे, १ महिना लागेल. पण, मी म्हणतो त्याला २ महिने घ्या पण जी आर काढा. आता सगेसोयरेचा निर्णय घ्या म्हणालो. ते म्हणताय याला वेळ लागेल, ८ लाख चुकीच्या नोंदी आहेत, त्याबद्दल वेळ लागणार आहे. आता, हैदराबाद आणि सातारा या २ गॅजेटच्या अंमलबजावणीचा निर्णय घेतला आहे. बाकी ५ मागण्यांचा शासन निर्णय काढू म्हणत आहेत, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी शासनाने आपल्या मागण्या मान्य केल्याची घोषणा केली.

## मराठा आरक्षणाच्या लढ्याला यश: डोणगावमध्ये फटाक्यांची आतिषबाजी, करुन जल्लोष



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव ता. मेहकर जि. बुलढाणा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला अखेर यश आले असून, सरकारने त्यांच्या प्रमुख मागण्या मान्य केल्यानंतर राज्यभरातून आनंदोत्सव साजरा केला जात आहे. जिल्ह्यातील डोणगाव गावातही समाजबांधवांनी जल्लोषात प्रतिक्रिया व्यक्त केली.

गावात मोठ्या प्रमाणात फटाके फोडून, एकमेकांना पेढे वाटून आणि आनंदाने घोषणा देत समाजबांधवांनी आपला आनंद व्यक्त केला. यावेळी ''छत्रपती शिवाजी महाराज की जय'', ''मनोज जरांगे पाटील यांचा विजय असो'' अशा घोषणांनी गावात चैतन्य निर्माण झाले होते.

मनोज जरांगे पाटील यांच्या शांततामय आणि ठाम नेतृत्वामुळे मराठा समाजाला हक्काचे आरक्षण मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यांच्या या लढ्याला मिळालेले यश हे संपूर्ण समाजाच्या एकजुटीचे प्रतीक ठरले आहे, असे भावना अनेकांनी व्यक्त केल्या.

स्थानिक नेते, ग्रामस्थ, युवक यांची प्रतिक्रिया: डोणगावमधील अनेक ज्येष्ठ नागरिक व तरुणांनी यावेळी प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे यांच्या संघर्षाचे कौतुक केले. ''आम्ही वर्षानुवर्षे आरक्षणासाठी लढत होतो, पण जरांगे पाटील यांनी हे आंदोलन एका निर्णायक टप्प्यावर नेले,'' असे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.

## पूराच्या पाण्यात पर्यटकांची कार वाहून गेली; सुदैवाने जीवितहानी टळली

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी:** सहस्त्रकुंड धबधबा सध्या भर पावसामुळे ओसंडून वाहत आहे आणि त्याच्या निसर्गरम्य रूपाचे दर्शन घेण्यासाठी मराठवाडा व विदर्भातून पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. अशाच प्रकारे पुसद येथून आलेले एक कुटुंब १ सप्टेंबरच्या संध्याकाळी धबधब्याला भेट देण्यासाठी आले होते.दरम्यान, सायंकाळी सातच्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसामुळे सहस्त्रकुंड-जेवली मार्गावरील नाल्यावर अचानक पूर आल्याने वाहनचालकाचा अंदाज चुकला आणि त्याने कार थेट पुराच्या पाण्यात घातली. पाहता पाहता कार पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली.

कारमध्ये हाफिज उल्ला खान, आसिया खान आणि नाजेना खान (सर्व रा. पुसद) हे तिघेही प्रवासी होते. सुदैवाने, कार प्रवाहात वाहून गेल्यानंतर ती एका काठाला अडकली आणि सर्व प्रवासी सुखरूप बाहेर पडले. मात्र, कार पूर्णपणे पाण्यात वाहून गेली.

आज सकाळी क्रेनच्या सहाय्याने सदर कार बाहेर काढण्यात आली. अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून स्थानिक नागरिक व पर्यटकांकडून या मार्गावरील नाल्यांवरील पुलांची उंची वाढवण्याची मागणी करण्यात येत आहे.



## महाराष्ट्रात तुफान पावसाची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** देशाच्या अनेक भागात सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे. विशेषतः उत्तरेकडील राज्यांमध्ये म्हणजे जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा, चंदीगड या भागात प्रचंड पावसासह वादळी वारे वाहत आहेत. दरम्यान आजपासून राज्यभरातील पावसाचा जोरही वाढणार आहे. आज मराठवाडा विदर्भ उत्तर महाराष्ट्र तसेच कोकण किनारपट्टीवर जोरदार पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत. पुणे सातारा व कोल्हापूर घाटमाथ्यावर पावसाचा येलो अलर्ट आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालचा उपसागरावर सध्या चक्राकार वाऱ्यांची स्थिती सक्रिय आहे. येत्या २४ तासात हे वारे वायव्य दिशेला सरकणार असून वायव्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा तयार होणार आहे. त्यामुळे मध्य महाराष्ट्र कोकण व गोवा किनारपट्टीसह मराठवाडा व विदर्भात तुफान पावसाची हजेरी लागणार आहे.

# जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा असलेले शहर म्हणून नागपूरची नवीन ओळख – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### –गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रिकार्डमध्ये मेट्रोच्या कामठी मार्गावरील डबल डेकर उड्डाणपुलाची नोंद
### –मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत वर्ल्ड रेकार्डचे प्रमाणपत्र

**नागपूर/प्रतिनिधी :** महामेट्रोने अल्पावधीत जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचा विकास केल्यामुळे नागपूर या शहराला जागतिक ओळख मिळाली आहे. महामेट्रोने कामठी मार्गावरील सर्वात लांब डबल डेकर पुलाची निर्मिती केली असून या डबल डेकर पुलाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डमध्ये नोंद घेतली आहे. जागतिक दर्जाच्या या पुरस्कारामुळे नागपूर हे जगातील उत्कृष्ट पायाभूत शहर म्हणून नवीन ओळख निर्माण झाली असल्याचे गौरवउद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. या जागतिक पुरस्काराबद्दल महामेट्रोच्या अधिकाऱ्यांना त्यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.

रामगीरी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष उपस्थितीत गिनिज वर्ल्ड रेकार्डचे भारतातील प्रतिनिधी स्वप्नील डोंगरीकर यांनी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांना गिनिज वर्ल्ड रेकार्डमध्ये नोंद झाल्याचे प्रमाणपत्र प्रमाणपत्र प्रदान केले.

कामठी मार्गावरील डबल डेकर व्हायाडक्ट (मेट्रो) हा जगातील डबल डेकर व्हायाडक्ट आहे. मेट्रो व हायवे वाहतुकीसाठी ५.६३७ कि.मी. लांबीचा सिंगल कॉलम पिल्लरवर उभा असून हा स्थापत्य कलेचा अदभूत उदाहरण आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करुन बांधलेल्या या उड्डाणपुलाची गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डतर्फे नोंद घेतली आहे. यापुर्वी छत्रपतीनगर येथील ३.२ कि.मी. लांबीच्या डबल डक्ट उड्डाणपुलाची निर्मितीसाठी जागतिक स्तरावर नोंद घेण्यात आली होती. वास्तुकलेच्या या निर्मितीमुळे संत्राच्या शहरासोबतच पायाभूत सुविधांचे शहर म्हणून नवीन ओळख मिळाली आहे. या पुरस्काराने



नागपूरचा गौरव जागतिक स्तरापर्यंत पोहचला आहे. या डबल डेकर पुलाच्या निर्मितीसोबतच कामठी मार्गावर रेल्वे, महामार्ग वाहतूक तसेच मेट्रो वाहतुकीसाठी जागात प्रथमच अशा प्रकारच्या उड्डाणपुल तयार करण्यात आला आहे. हे जगातील प्रमुख अभियांत्रिकीमधली आश्र्चर्य आहे. या पुलासाठी १ हजार ६५० टन स्टिलचा वापर करण्यात आला आहे.

जगातील पहिल्या सर्वात लांब डबल डेकर व्हायाडक्ट या पुलाचे सर्व देशांना आकर्षन आहे. प्रत्यक्ष निर्मितीसंदर्भातील माहिती घेण्यासाठी अभियांत्रिकी व वास्तुकलेतील तज्ञ भेट देवून पाहणी करत आहे. अशा प्रकारच्या डबल डेकर पुलांची निर्मिती करणारे महामेट्रो व नागपूर हे पायोनिअर असल्याचे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

प्रारंभी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. त्यानंतर महामेट्रोतर्फे बांधण्यात आलेल्या भारतातील सर्वात लांब डबल डेकर मेट्रो व्हायाडक्ट या पुलाच्या निर्मितीसंदर्भातील चित्रफित यावेळी दाखविण्यात आली. तंत्रज्ञानाचा अतुलनिय वापर करुन उड्डाणपुलावर गड्डीगोदाम, कडबीचौक, इंदोरा चौक, नारी रोड, ऑटोमोटीव्ह चौक या पाच मेट्रो स्थानके बांधण्यात आली आहे. हा उड्डाणपुल चार पदरी असून पहिल्या स्तरावर महामार्ग, दुसऱ्या स्तरावर मेट्रो आणि जमिन स्तरावर आधीच असलेला महामार्ग आहे. या उड्डाणपुलामुळे कामठी मार्गावरील प्रचंड वाहतूक कोंडीतून नागरिकांना दिलासा मिंळाला आहे. यापूर्वी छत्रपती चौकाचा समावेश असलेल्या उड्डाणपुलाला देखील गिनिज वर्ल्ड रेकार्डमध्ये समावेश करण्यात आला आहे. यावेळी महामेट्रोचे संचालक अनिलकुमार कोकाट, प्रकल्प संचालक राजीव त्यागी, कार्यकारी संचालक नरेश गुरबानी, महाव्यवस्थापक यीन राठोड, विद्यासागर व्यवस्थापक प्रविण मारोती, प्रकाश मुदलियार आदी अधिकारी तसेच गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या चिंताजनक आत्महत्या

अलिकडल्या काळात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांत प्रचंड वाढ झाली आहे. दररोजच्या वर्तमानपत्रात शालेय किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची एखादी तरी बातमी असतेच. विद्यार्थी आत्महत्यांच्या वाढत्या घटनेबाबत सर्वत्र चिंता व्यक्त केली जात आहे. भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांबाबत भारतातच नव्हे तर जगभर चिंता व्यक्त होत आहे. मागील वर्षी भारतातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांबाबत एक अहवाल प्रसिद्ध झाला होता. नॅशनल क्राईम ब्युरोच्या डेटावर आधारित स्टुडंट्स सुसाईड : अन अपेडेमिक स्वीपिंग इंडिया नावाचा अहवाल वार्षिक आयसी ३ परिषद आणि आणि एक्स्पो २०२४ मध्ये जाहीर करण्यात आला होता. हा अहवाल अतिशय धक्कादायक आहे कारण या अहवालात आपल्या देशातील आत्महत्यांचे वास्तव मांडण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील आत्महत्यांच्या दरात कमालीची वाढ झाली आहे. दरवर्षी देशभरात ७० हजारांहून अधिक नागरिक आत्महत्या करत असून यात सर्वात जास्त आत्महत्या पुरोगामी महाराष्ट्रात होत आहेत. त्यातही धक्कादायक आणि चिंताजनक बाब म्हणजे यात सर्वाधिक आत्महत्या विद्यार्थ्यांच्या आहेत. त्यातही पुरोगामी महाराष्ट्राचा पहिला क्रमांक लागतो. महाराष्ट्रात सर्वाधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड या राज्याचा क्रमांक लागतो. विद्यार्थी आत्महत्येत महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर असणे ही भूषणावह बाब नसून शिव, फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणारी ही बाब आहे. कणखर देशा राकट देशा दगडांच्या देशा असा महाराष्ट्राचा उल्लेख होतो त्यात दुर्दैवाने आत्महत्यांच्या देशा असेही नमूद करावे लागत आहे. आज जगातील सर्वाधिक लोकसंख्या भारतात आहे आणि यात सर्वात जास्त तरुणांची संख्या आहे. भारतात तरुणांची संख्या जवळपास ६० टक्के इतकी आहे. इतके तरुण जगातील कोणत्याच देशात नाहीत म्हणूनच भारताकडे आगामी महासत्ता म्हणून पहिले जाते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणांच्या जोरावरच भारत जागतिक महासत्ता बनेल असा विश्वास त्यांना होता. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण जर असा अकाली मृत्यूला कवटाळू लागला तर देशाच्या भविष्यावरच प्रश्न चिन्ह निर्माण होऊ शकते म्हणूनच विद्यार्थ्यांच्या या आत्महत्या राज्यकर्त्यांनी गांभीर्याने घ्याव्यात आणि आत्महत्या कमी रोखण्यासाठी ठोस धोरण आखायला हवे. अर्थात विद्यार्थी आत्महत्या का करतात याचाही विचार व्हायला हवा. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमागे अनेक करणे आहेत त्यातील प्रमुख कारण म्हणजे पालकांच्या मुलांकडून अनाठायी अपेक्षा. शिक्षणातील भयंकर स्पर्धा, गुणांची जीवघेणी चढाओढ, शिक्षण घेऊनही रोजगार न मिळणे, प्रेमभंग या आणि अशा अनेक कारणांमुळे तरुण अकाली मृत्यूला कवटाळीत आहेत. समाज माध्यमांचा वाढता प्रभाव हे देखील विद्यार्थी आत्महत्यांच्या कारणांपैकी महत्वाचे कारण आहे. समाज माध्यमांच्या आहारी गेल्यामुळे मुले खूप भावनिक झाली आहे. आपल्या भावनांना आवर न घालता आल्याने मुले आत्महत्येचा मार्ग स्वीकारीत आहेत. ब्लू व्हेल, पोकोमन यासारख्या हिंसक गेम्समुळे देखील अनेक मुलांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. विद्यार्थ्यांना पालकांकडून हल्ली अनेक गोष्टी सहज उपलब्ध होऊ लागल्या आहेत त्यामुळे एखादी गोष्ट जेंव्हा मिळत नाही तेंव्हा ती मिळावी यासाठी विद्यार्थी अट्टाहास करतात मग त्यांना त्यात अप्याश आले की ते मृत्यूला कवटाळतात म्हणून पालकांनी मुलांना नकार पचवायला शिकवले पाहिजे. पालकांनी मुलांवर अपेक्षांचे ओझेही लादू नये. विद्यार्थी आत्महत्या म्हणजे देशाची हानी त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याची जबाबदारी केवळ पालकांचीच आहे असे नाही तर शाळा, कॉलेज, शिक्षक, समाज आणि शासनाचीही आहे. या सर्व घटकांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखणयासाठी प्रयत्न करायला हवेत.

# रविकांत तुपकर व कार्यकर्त्यांची निर्दोष मुक्तता

## ■ २०१३ सालचे अन्न व औषध विभागातील गाजलेले आंदोलन..

## ■ १२ वर्षांपासून सुरु होता खटला ■ ॲड. शर्वरी सावजी-तुपकरांचा यशस्वी युक्तीवाद..

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** २ सप्टेंबर रोजी बुलडाणा जिल्हा व सत्र न्यायालयाने २०१३ साली झालेल्या अन्न औषध विभागातील आंदोलनातून रविकांत तुपकर व कार्यकर्त्यांची निर्दोष मुक्तता केली आहे.बुलडाणा शहरातील हमरस्त्यावरील मटणाचे दुकान हटवण्यासाठी तुपकरांनी अन्न विभागाचे सहायक आयुक्त घनश्याम दंदे यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली होती, त्यावेळी हे आंदोलन खूप गाजले होते, हे विशेष..!

१२ वर्षापूर्वी बुलडाणा शहरातील क्रीडा संकुल रोड वरील, राजमाता चौक,सोळंके ले आऊट येथे मुख्य रस्त्यावर एका गृहस्थाने मटणाचे दुकान थाटले होते. सदर मटण दुकानाचा परीसरातील नागरिकांना प्रचंड त्रास होत होता. प्रचंड वास व घाणीचे साम्राज्य परीसरात निर्माण झाले होते.मांस विक्री दुकान हे मांसविक्री दुकानाच्या नियमांची पायमल्ली करून सुरू होते. अन्न प्रशासन विभागाच्या कायद्यांना केराची टोपली दाखवत अन्न प्रशासन विभागाने परवानगी देण्याचा प्रताप केला होता, यात नगरपालिका प्रशासनही सहभागी होते. परीसरातील नागरिकांनी वारंवार नगरपालिका व अन्न -औषध प्रशासन विभागाला वारंवार तक्रारी करूनही प्रशासन ढिम्म होतं. कोणतीही कारवाई प्रशासनाने केली नाही अखेर व्यथित होऊन परिसरातील नागरिकांनी युवा नेते रविकांत तुपकर यांच्या कडे आपली व्यथा मांडली.

रविकांत तुपकर यांनी शहरातील नागरिकांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत, अन्न व औषध प्रशासन विभाग गाठला.अन्न प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त घनश्याम दंदे व कार्यालय प्रमुख प्रशांत अजिंठेकर यांच्या कडे आक्रमक होत जाब विचारला. नागरिकांच्या समस्या समजावून का घेत नाही?? असा सवाल करत,नियमांच्या पायमल्ली वर तुपकरांनी बोट ठेवले. अन्न -विभागाच्या कार्यालयात तुपकरांमध्ये व सहायक आयुक्त घनश्याम दंदे यांचेमध्ये जोरदार खडाजंगी झाली. आक्रमक होत तुपकरांनी व



कार्यकर्त्यांनी सहायक आयुक्तांना बेशरमचे झाड देऊन आंदोलन केले. प्रचंड घोषणाबाजी करून ठिय्या मांडला, यावेळी कार्यकर्त्यांनी अधिकाऱ्यांना झटापट केली.रविकांत तुपकरांनी सहायक आयुक्त घनश्याम दंदे यांची जोरदार खरडपट्टी काढली. चिडलेल्या अन्न विभागाचे सहाय्यक आयुक्त घनश्याम दंदे यांनी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात रविकांत तुपकर, राणा चंदन, महेंद्र जाधव, ज्ञानदेव हरमकार, गंगाधर तायडे , गजानन गवळी यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या विरोधात तक्रार केली. तुपकरांनी मला हात पाय तोडण्याची धमकी देऊन,मारहाण केली व शिविगाळ करत सरकारी कामकाजात अडथळा आणला.माझा हात ओढत ऑफिस बाहेर खेचले, स्पॉट वर जाऊन मटण दुकान सिल करायला सांगितले, बेशरमचे झाड देऊन अपमान केला असे आरोप तुपकरांवर केले. रविकांत तुपकर व कार्यकर्त्यांवर गंभीर गुन्हे दाखल केले होते. याप्रकरणात १७ जुलै २०१३ रोजी भांदवि कलम १४३,१८६,३५३,५०४,,५०६ या कलमा अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते.

हे प्रकरण गेल्या १२ वर्षापासून बुलडाणा जिल्हा न्यायालयात सुरु होते. आरोपींच्या वकील ऍड शर्वरी सावजी -तुपकरांचा व सरकारी वकिलांचा युक्तीवाद जिल्हा न्यायालयाने ऐकून घेतला.सर्व साक्षी पुरावे तपासल्या नंतर आज दि २ सप्टेंबर रोजी अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. जी.संतांनी यांनी रविकांत तुपकर व कार्यकर्त्यांची निर्दोष मुक्तता केली. आरोपींच्या वतीने शर्वरी सावजी -तुपकर यांनी प्रभावी युक्तीवाद केल्यानेच कार्यकर्त्यांची निर्दोष मुक्तता झाल्याची चर्चा न्यायालय परिसरात होती.या निर्णयानंतर बोलतांना रविकांत तुपकर म्हणाले ''आज अखेर सत्याचा विजय झाला.जनतेच्या प्रश्नांसाठी आवाज उठवणे गुन्हा आहे का..? कितीही खोट्या केसेस केल्या तरीही आम्ही डगमगणार नाही, रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत सामान्यांच्या हक्कासाठी ताकदीने लढत राहू, प्रसंगी वारंवार जेलमध्ये जाऊ,पण जनतेच्या प्रश्नावर कायम रस्त्यावर उतरू,असेही तुपकर म्हणाले.

## वरुण धवनच्या रोमँटिक गाण्यावर मराठी अभिनेत्रीचं सुंदर सादरीकरण!

**मुंबई/प्रतिनिधी:**'झी मराठी' वाहिनीवरील 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेच्या माध्यमातून अभिनेत्री वल्लरी विराज घराघरांत लोकप्रिय झाली. या मालिकेत प्रेक्षकांना एजे आणि लीलाची अनोखी प्रेमकहाणी पाहायला मिळाली होती. प्रेक्षकांच्या मनावर वर्षभर अधिराज्य गाजवल्यावर 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेने मे महिन्यात सर्वांचा निरोप घेतला. मात्र, वल्लरीने प्रेक्षकांच्या मनात कायमचं स्थान निर्माण केलं आहे. वल्लरी विराज उत्तम अभिनेत्री आहेच पण, त्याचबरोबरीने ती नृत्यांगना म्हणून देखील ओळखली जाते. मालिका संपल्यावर वल्लरीचे डान्स व्हिडीओ सध्या सर्वांचं लक्ष वेधून घेत आहेत. वल्लरी आणि आलापिनी या दोघी अनेकदा ट्रेंडिंग गाण्यावर सुंदर डान्स सादर करतात आणि सर्व चाहत्यांकडून कौतुकाची थाप मिळवतात.

मात्र, या व्हिडीओमध्ये वल्लरीने सोलो परफॉर्म केलं आहे. तिने नुकताच शेअर केलेला डान्स व्हिडीओ सर्वत्र चर्चेत आला आहे. यामध्ये अभिनेत्रीने बॉलीवूडच्या 'छाव लागा' या रोमँटिक गाण्यावर सादरीकरण केलं आहे. या गाण्यातील वल्लरीच्या कमाल एक्स्प्रेशन्सनी सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. नेटकऱ्यांनी सुद्धा व्हिडीओच्या कमेंट्समध्ये वल्लरीचं भरभरून कौतुक केलं आहे.'छाव लागा' हे गाणं वरुण धवन आणि अनुष्का शर्माची मुख्य भूमिका असलेल्या 'सुई धागा' सिनेमातील आहे. २०१८ मध्ये हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. यामधील 'छाव लागा' हे मूळ गाणं पॅपोन आणि रोंकिनी गुप्ता यांनी गायलं आहे. याच गाण्यावर आता मराठमोळी अभिनेत्री वल्लरी विराज थिरकली आहे. 'छाव लागा' या गाण्यातील प्रत्येक ओळीनुसार अभिनेत्रीने कमाल एक्स्प्रेशन्स देऊन हे सादरीकरण केलं आहे.

# शाश्वत विकासाची दूरदृष्टीपूर्ण लोकचळवळ; "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान"











**किरण वाघ**
विभागीय संपर्क अधिकारी

आपला भारत देश हा कृषिप्रधान आहे आणि गाव हे त्याचे प्राणकेंद्र आहे. त्यामुळे गावांचे प्रश्न सोडविल्याशिवाय आणि त्यांचा शाश्वत विकास साधल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. शाश्वत विकास हा असा विकास आहे, जो सध्याच्या पिढीच्या गरजा भागविताना पुढील पिढ्यांसाठी साधन संपत्तीचे सातत्याने संवर्धन करत राहतो. म्हणूनच गावांचा शाश्वत विकास हा आपल्या राज्याच्या व राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज अनेक गावांमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, रस्ते, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा या मूलभूत गरजांसह रोजगार, माहिती तंत्रज्ञान, शाळांमध्ये शिक्षणाचा उच्च दर्जा, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण सुविधा, प्राथमिक आरोग्य केंद्रे तेथे औषधांची उपलब्धता, तज्ञ डॉक्टरांची सेवा अशा प्राथमिक चांगल्या सुविधा उपलब्ध करणे यासाठी शासन मोठ्या प्रमाणात काम करते.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत ''मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. अभियानाचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी १७ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे. ही अंमलबजावणी केवळ स्पर्धात्मक राहणार नसून ग्रामविकास अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप देणारी ठरेल.

हे अभियान राबविण्याची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. २९ जुलै २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाची यास मंजुरी मिळाली व अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महत्वाचे पाऊल टाकले गेले. अभियान राबविण्यासाठी ₹२९०.३३ कोटींची तरतूद करण्यात आली, त्यापैकी ₹२४५.२० कोटी पुरस्कारांसाठी, तर उर्वरित निधी प्रचार, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनासाठी वापरण्यात येणार आहे.

**अभियानाचे उद्दिष्ट**

या अभियानाचा मुख्य उद्देश गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करणे आहे. योजना केवळ प्रशासकीय यंत्रणेपुरती मर्यादित नसून, ग्रामस्थांच्या थेट सहभागावर आधारलेली आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास विभाग शाश्वत विकास साधण्यासाठी ठिबक सिंचन, शेततळी, बंधारे, जलसंवर्धन, जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी प्रयत्न, आवास योजनांतर्गत घरे, महिलांना बचतगटांच्या माध्यमातून सक्षम करणे, तसेच दुग्धोत्पादन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय आणि कुक्कुटपालन यांना चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. या प्रयत्नांना अभियानातून प्रोत्साहन मिळणार आहे.

**अभियानाचे ७ प्रमुख घटक**

१. सुशासनयुक्त पंचायत पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन

२. सक्षम पंचायत आर्थिक स्वावलंबन, कंपनी सामाजिक उत्तरदायित्व निधी व लोकवर्गणी

३. जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव पर्यावरण संरक्षण व पाणी व्यवस्थापन

४. योजनांचे अभिसरण मनरेगा व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी

५. संस्था सक्षमीकरण शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे यांची बळकटी

६. उपजीविका विकास व सामाजिक न्याय रोजगार निर्मिती व महिला सक्षमीकरण

७. लोकसहभाग व श्रमदान ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग व श्रमदान

खरं तर सातवा घटक वैशिष्ट्यपूर्ण असून गावकऱ्यांचा थेट सहभाग व श्रमदान याचा अर्थ लोकसहभाग व श्रमदान यातून हे अभियान लोकचळवळ बनणे अपेक्षित आहे. अभियानाला प्रोत्साहन देण्याचे काम पुरस्काराच्या रूपाने होईल. पुरस्कारांसाठी एकूण २४५.२० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकूण १९०२ यशस्वी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. या गावांच्या विकास कामांसाठी या ग्रामपंचायतींना मोठा निधी उपलब्ध होईल.

**पुरस्कार रचना**

राज्यात प्रथम विजेत्या ग्रामपंचायतीस ५ कोटी रुपयांचा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जाईल. तर द्वितीय ३ कोटी रुपये, तृतीय २ कोटी रुपये पुरस्कार असेल .

**विभागस्तरीय पुरस्कार**

प्रत्येक विभागात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रुपये १कोटी, द्वितीय रुपये ८० लाख, तृतीय रुपये ६० लाख

**जिल्हास्तरीय पुरस्कार**

प्रत्येक जिल्ह्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रू ५० लाख, द्वितीय रू ३० लाख, तृतीय रुपये २० लाख

**तालुकास्तरीय पुरस्कार**

प्रत्येक तालुक्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार प्रथम रुपये १५ लाख, द्वितीय रुपये १२ लाख, तृतीय रुपये ८ लाख

**विशेष पुरस्कार**

प्रत्येकी तालुक्यातील २ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ५ लाख रुपये पुरस्कार आहे.

विभाग आणि राज्यस्तरावर पंचायत समित्यांसाठी आणि जिल्हा परिषदासाठी ही आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहे.

पंचायत समित्यांना ३ राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतील. प्रथम २ कोटी, द्वितीय १.५ कोटी, तृतीय १.२५ कोटी असे पुरस्कार आहे.

विभागस्तरीय पुरस्कारांमध्ये प्रथम १ कोटी, द्वितीय ७५ लाख, तृतीय ६० लाख रुपये असे आहे

जिल्हा परिषदांना अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी राज्यात ३ जिल्हा परिषदांना पुरस्कार आहेत यात प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी, तृतीय २ कोटी असे पुरस्कार दिले जातील.

या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा असून, एकूण १०० गुणांच्या निकषांवर मूल्यांकन केले जाईल. पारदर्शक प्रशासन, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार, पर्यावरण, कर वसुली आणि लोकसहभाग यांचा विचार केला जाईल. प्रत्येक ग्रामपंचायतीने दररोजचा अहवाल विशेष मोबाईल ॲप्लिकेशन आणि वेबसाईटवर सादर करावा लागेल.

अभियानापूर्वी राज्यस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रशिक्षण, तसेच ग्रामसभांच्या माध्यमातून तयारी केली जाईल. व्यापक जनजागृतीसाठी कार्यशाळा, पोस्टर, बॅनर, सोशल मिडिया, यशोगाथा चित्रफीत आणि इतर साधनांचा उपयोग केला जाणार आहे.

राज्य आणि देशाच्या शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण ही प्रगतीची पहिली पायरी आहे. सक्षम युवा पिढी घडवण्यासाठी गावांमध्ये डिजिटल वर्ग, ई-लर्निंग, पुस्तकालये, तसेच कौशल्याधारित प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणे. यातून युवक युवतींना संगणक, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रिक, शिवणकाम, कारागिरी अशा विविध व्यवसाय शिक्षणातून कौशल्य दिल्यास रोजगार निर्मिती व उद्योजकता वाढेल. अशा गावाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या सर्व घटकांना चालना देण्यावर या निमित्ताने लक्ष दिले जात आहे.

''मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान'' ही केवळ स्पर्धा नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाची दिशा आहे. प्रत्येक ग्रामस्थाने यात सहभाग घेतल्यास गावांचा चेहरामोहरा बदलून शाश्वत विकास साध्य होईल. हे अभियान खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे दूरदृष्टीपूर्ण पाऊल ठरेल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# अतिवृष्टी आणि रोगटऱ्यामुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान, शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी:** अमरावती तालुक्यातील शेतकऱ्यांना यंदाच्या खरिपात अतिवृष्टी आणि अचानक आलेल्या रोगांमुळे मोठा फटका बसला आहे. विशेषतः सोयाबीन पिकाचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून, अनेक शेतकऱ्यांचे शेत उध्वस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकरी नेते प्रकाश साबळे यांच्या नेतृत्वाखाली नादुरा, पुसदा आणि परिसरातील असंख्य शेतकऱ्यांनी खराब झालेले सोयाबीन घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली.

शेतकऱ्यांनी खराब झालेल्या पिकांचे प्रत्यक्ष नमुने जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करत, त्यांना झालेल्या नुकसानीचे दृश्य प्रमाण देण्याचा प्रयत्न केला. अनेकांच्या शेतात सोयाबीन पिकावर करपा, शेंगांचा सड, पानांवर डाग पडणे यासारखे रोग आढळून आले. याशिवाय, झालेल्या सततच्या पावसामुळे पीक जमिनीतच कुजले.

या शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई जाहीर करावी. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट आणि तातडीने आर्थिक मदत द्यावी. या संकटग्रस्त भागांना दुष्काळग्रस्त क्षेत्र म्हणून जाहीर करावे. पुढील हंगामासाठी बियाणे, खत, शेतीसाहित्य यावर सवलती देण्यात याव्यात.





प्रकाश साबळे, शेतकरी नेते यांचे म्हणणे : ''सरकारने शेतकऱ्यांच्या वेदना समजून घ्याव्यात. आमचं पीक गेलंय, घर चालवायचं कसं? आम्ही आज खराब सोयाबीन घेऊन आलोय, कारण हेच आमच्या संकटाचं पुरावं आहे. जर याहीवेळी मदत मिळाली नाही, तर शेतकरी आत्महत्या करण्याच्या उंबरठ्यावर येईल.''

या आंदोलनामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, प्रशासनाने शेतकऱ्यांचे निवेदन स्वीकारून तपासणीसाठी कृषी विभागाला निर्देश दिल्याचे सांगितले.

ही घटना केवळ अमरावती पुरती मर्यादित नसून, संपूर्ण विदर्भात अशा अनेक तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे राज्य शासन आणि कृषी विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, याचा गंभीर परिणाम शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर आणि संपूर्ण कृषी अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.

## संक्षिप्त...

### विधी संघर्षित बालकाकडून भिकाऱ्याची हत्या ठक्कर बाजार परिसरात खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी:** ठक्कर बाजार परिसरात एका विधी संघर्षित बालकाकडून एका भिकाऱ्याची हत्या झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. मैत्रिणीची छेड काढल्याच्या संशयावरून रागाच्या भरात या बालकाने भिकाऱ्याच्या डोक्यात दगड घालून त्याचा जागीच खात्मा केला. ही घटना परिसरात भीतीचं वातावरण निर्माण करणारी ठरली आहे.


पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, संबंधित विधी संघर्षित बालक आपल्या मैत्रिणीसोबत ठक्कर बाजार जवळील एका हॉटेलजवळ थांबला होता. याचदरम्यान ती मुलगी पाणी आणण्यासाठी थोडं पुढे गेली असता, त्या ठिकाणी बसलेल्या एका भिकाऱ्याने तिची छेड काढल्याचा संशय बालकाला आला. संतापाच्या भरात त्याने जवळच पडलेला मोठा दगड उचलून भिकाऱ्याच्या डोक्यात घातला.

या हल्ल्यात भिकाऱ्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर काही वेळातच गुन्हे शाखा युनिट एकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने तात्काळ कारवाई करत संबंधित विधी संघर्षित बालकाला ताब्यात घेतलं. सरकार वाडा पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून, पुढील तपास सुरू आहे.

पोलीस निरीक्षक सुरेश आव्हाड यांनी सांगितले की, ''घटना गंभीर आहे. तपास सुरू असून संबंधित बालकाबाबत आवश्यक विधी प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.''

### पिंपळपानावर रक्ताने काढले चित्र: चिंचोलीतील कलाकार अशोक जाधव यांचा आंदोलनाला अनोखा पाठिंबा

**चिंचोली/ प्रतिनिधी:** चिंचोली (ता. शिराळा, जि. सांगली) मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबई येथे सुरू असलेल्या मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला शिराळा तालुक्यातील एका अनोख्या पद्धतीने पाठिंबा मिळाला आहे. चिंचोली येथील सुप्रसिद्ध चित्रकार व काष्ठशिल्पकार अशोक जाधव यांनी स्वतःच्या रक्ताचा वापर करून पिंपळपानावर छत्रपती शिवाजी महाराज आणि मनोज जरांगे-पाटील यांची चित्रे साकारली आहेत.




या चित्रांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ अवस्थेत आहेत, तर दुसऱ्या चित्रात मनोज जरांगे-पाटील यांचा संघर्षमय आविष्कार करण्यात आला आहे. ही दोन्ही चित्रे अत्यंत नाजूक पिंपळपानावर काढलेली असून, त्यासाठी त्यांनी स्वतःच्या शरीरातून रक्त काढून वापर केले आहे.

अशोक जाधव हे गेल्या अनेक वर्षांपासून लाकडी शिल्पकलेत आणि सूक्ष्म चित्रकलेत पारंगत आहेत. त्यांनी याआधीही विविध सामाजिक, ऐतिहासिक आणि पर्यावरण विषयांवर आधारित कलाकृती सादर केल्या आहेत. मात्र, रक्ताने चित्र काढण्याचा हा त्यांचा पहिलाच प्रयोग आहे.

यासंदर्भात बोलताना अशोक जाधव म्हणाले, ''मनोज जरांगे-पाटील हे संपूर्ण मराठा समाजासाठी लढत आहेत. त्यांचा त्याग आणि संघर्ष हे आमच्यासाठी प्रेरणादायी आहेत. मी कलाकार म्हणून माझ्या पद्धतीने या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.''

या अनोख्या पद्धतीने व्यक्त झालेला पाठिंबा सध्या सोशल मिडियावरही चर्चेचा विषय ठरत आहे. अशा प्रकारच्या कलात्मक आंदोलने लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यास निश्चितच प्रभावी ठरतात.

# घरफोड्यांच्या मालिकेला आळा

## नाशिक पोलिसांची मोठी कारवाई, सराईत चोरटा अटकेत






दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी:** शहरात गेल्या काही दिवसांपासून घरफोड्यांच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं. मात्र आता नाशिक पोलिसांनी केलेल्या यशस्वी कारवाईमुळे या चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यात यश आलं आहे. पंचवटी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने आखलेल्या विशेष मोहिमेत ४८ वर्षीय फारूक रज्जाक काकर या सराईत चोरट्याला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून तब्बल १३ लाख ६ हजार ७५४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१० घरफोड्यांची कबुली

पोलिसांच्या तपासात आरोपी फारूक काकर याने पंचवटी आणि म्हसरूळ पोलीस ठाणे हद्दीतील १० घरफोड्यांची कबुली दिली आहे. त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्ह्यांची नोंद असून, तो अत्यंत नियोजनबद्ध आणि शिताफीने चोरी करत असल्याचं उघड झालं आहे.

इतक्या ऐवजाची चोरी

आरोपीकडून पोलिसांनी खालीलप्रमाणे ऐवज हस्तगत केला आहे:

११ तोळे सोने

१.५ किलोहून अधिक चांदी

रोख रक्कम

एकूण किंमत: ₹१३,०६,७५४/-

पोलिसांची अचूक कारवाई

पंचवटी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने हा तपास सुरू करत विशेष पथक तयार केले. आरोपीवर बारीक नजर ठेवून, सापळा रचून त्याला शिताफीने अटक करण्यात आली. ही संपूर्ण कारवाई पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संगीता निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

यशस्वी पथकाची कामगिरी

या ऑपरेशनमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखालील पथकाने मोलाची भूमिका बजावली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश शिरसाठ सहाय्यक पोलीस निरीक्षक संपत जाधव गुन्हे शोध पथकातील इतर अंमलदार यांच्या समन्वयातून ही कारवाई यशस्वी झाली.

काय म्हणाले पोलीस उपायुक्त?

या संदर्भात पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांनी माहिती देताना सांगितले की,

''घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारांना पकडणे ही आमच्यासाठी प्राधान्याची बाब आहे. नागरिकांनी सतर्क राहावं आणि संशयास्पद व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी.''

पोलिसांच्या या यशस्वी कारवाईमुळे पंचवटी आणि म्हसरूळ परिसरातील नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आहे. परंतु, चोरीच्या घटनांवर पूर्णतः नियंत्रण मिळवण्यासाठी नागरिकांचा सहभाग आणि सतर्कता तितकीच आवश्यक असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

### मराठा आरक्षण आंदोलनावर खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांची स्पष्ट भूमिका



**सातारा/प्रतिनिधी:** मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरात आंदोलन तीव्र होत असताना, साताऱ्याचे खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांनी यां आंदोलनावर आपली ठाम आणि स्पष्ट भूमिका मांडली आहे. प्रकृतीच्या कारणामुळे आंदोलन स्थळी प्रत्यक्ष उपस्थित राहता न आल्याचे त्यांनी सांगितले असले, तरी आपल्या पाठिंब्याबाबत त्यांनी कोणतीही शंका उरलेली नाही.

''माझ्या पोटात असतं तेच माझ्या ओठात असतं. जे योग्य आहे तेच मी योग्य म्हणतो,'' असे सांगत उदयनराजेंनी आपले स्पष्टवक्तेपण अधोरेखित केले. ''सध्या माझी प्रकृती ठीक नाही. कालच रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यामुळे मी प्रत्यक्ष आंदोलनस्थळी हजर राहू शकत नाही. मात्र, यापूर्वी मी अंतरवाली सराटीला भेट दिली होती,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

उदयनराजे यांनी राज्य सरकारला लवकरात लवकर आंदोलनावर तोडगा काढण्याचे आवाहन केले. ''मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांच्या प्रमुखांशी थेट संवाद साधावा आणि तोडगा काढावा,'' अशी स्पष्ट विनंती त्यांनी केली. ''मी अजून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधलेला नाही. मात्र, माध्यमांच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत हा संदेश पोहोचवतो,'' असे ते म्हणाले.

याशिवाय, मनोज जरांगे पाटील यांच्या आरोग्याबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. ''जरांगे यांनी आपली तब्येत सांभाळावी,'' असे सांगत त्यांनी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही शासनाने मूलभूत सुविधा देण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले.

राज्यभर मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून अस्वस्थता वाढत असताना, खासदार उदयनराजे भोसले यांची भूमिका ही तटस्थतेपेक्षा ठाम आणि समाजाभिमुख असल्याचे या वक्तव्यावरून स्पष्ट होते. त्यांच्या या विधानामुळे राज्यातील राजकीय वातावरणात हलचल निर्माण होण्याची शक्यता आहे.

### मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मनसेचा पाठिंबा; नांदेडहून २५ हजार नागरिकांसाठी जेवणाची व्यवस्था



**नांदेड/ प्रतिनिधी:** मराठा आरक्षणासाठी मुंबई येथे सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला राज्यभरातून विविध स्तरांतून पाठिंबा मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे युवा अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत नांदेड जिल्हा मनसेतर्फे आंदोलनाला ठोस पाठींबा देण्यात आला आहे.

नांदेड जिल्हा मनसे अध्यक्ष विनोद पावडे यांच्या पुढाकाराने २० ते २५ हजार नागरिकांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. हे अन्न मुंबईतील उपोषण स्थळी पाठवण्यात येणार असून, त्यासाठीची जय्यत तयारी नांदेड शहरात मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.

''मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाच्या हक्कासाठी लढत आहेत. त्यांच्या आंदोलनात सहभागी झालेल्या हजारो नागरिकांसाठी अन्नाची सोय करणं ही आपली सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे नांदेड जिल्हा मनसेतर्फे हे जेवण आज संध्याकाळी मुंबईकडे रवाना करण्यात येईल,'' अशी माहिती जिल्हाध्यक्ष विनोद पावडे यांनी दिली.

# यवतमाळमध्ये गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद व दुर्गोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचे पथसंचलन

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**यवतमाळ** : आगामी श्री गणेशोत्सव, ईद-ए-मिलादुन्नबी आणि श्री दुर्गोत्सव यांसारख्या महत्वपूर्ण सणांच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या उद्देशाने दिनांक १ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता पोलीस पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले.

या पथसंचलनाची सुरुवात दिग्रस पोलीस स्टेशनपासून करण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे संचलन पार पडले. शहरातील मुख्य मार्गांवरून मार्गक्रमण करत दुपारी ५.४५ वाजता पुन्हा पोलीस स्टेशन येथे सांगता झाली.

संचलन मार्ग:

बिरसा मुंडा चौक, वाल्मीकनगर चौक, श्री घंटीबाबा मंदिर चौक, टिपू सुलतान चौक, आर्णी नाका, कच्ची चौक, कमान गेट, आदिलशहा बाबा दर्गा, मुक्कावार कॉम्प्लेक्स, दुर्गामाता चौक, विठ्ठल मंदिर, ब्राह्मणपुरी, शंकर टॉकीज चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जुने बस स्थानक, नगरपरिषद समोरून हे संचलन पुन्हा पोलीस स्टेशनवर येऊन संपन्न झाले.

पथसंचलनात सहभागी अधिकारी व कर्मचारी:

या पथसंचलनात दारव्हा उपविभागीय पोलीस, अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे, ४ पोलीस अधिकारी, ३६ पोलीस कर्मचारी, ४० होमगार्ड एसआरपीएफचे १ अधिकारी व ३० पोलीस अमलदार अशा मोठ्या प्रमाणावर फौजफाटा सहभागी होता.

मार्गदर्शन आणि पाहणी:

संचलनादरम्यान गणेश विसर्जन व ईद-ए-मिलादच्या मिरवणूक मार्गाची पाहणी करण्यात आली. मार्गात येणाऱ्या अडथळ्यांची नोंद घेऊन संबंधित विभागाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना दुरुस्ती करण्यास सूचना देण्यात आल्या.



## विविध वृत्त...

### खामगाव शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशिक्षण २ सप्टेंबरपासून सुरु

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगाव येथे ऑगस्ट २०२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण २ सप्टेंबरपासून नियमित सुरू झाले आहे. प्रवेशित सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगाव यांनी केले आहे.

### मेहकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये विविध पदांसाठी ८ सप्टेंबर रोजी मुलाखती; उमेदवारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मेहकर, जि. बुलडाणा येथे विविध पदासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. उमेदवारांनी दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजेपर्यंत आयटीआय मेहकर येथे मुळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष मुलाखतीसाठी हजर राहावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य व्ही.बी. शिरसाट यांनी केले आहे.

सोलर टेक्निशियनचे(इलेक्ट्रीकल) २ पदे(ठोक मासिक वेतन), जोडारीचे १ पद(तासिका तत्वावर), इम्प्लॉयबिलिटी स्कील/कॉम्प्युटर ऑपरेटर १ पद (तासिका तत्वावर), मेकॅनिक इलेक्ट्रीक व्हेईकल १ पद(ठोक मासिक वेतन). सर्व पदांसाठी NSQF लेव्हलनुसार ट्रेड सिलेबसप्रमाणे पात्रता आवश्यक आहे. तसेच किमान एक वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

याआधी सदर पदांसाठी मुलाखत दिलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये. असे अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी. तासिका व मासिक वेतन हे डिजिइटी (DGET) च्या मानदंडानुसार देण्यात येईल. निवड प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार हे प्राचार्य, आयटीआय मेहकर यांचेकडे राहतील.

### जिल्हा रुग्णालयातील दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्हा रुग्णालय बुलडाणा येथे प्रत्येक शुक्रवार नियमित पणे नेत्र, मतिमंद, मनोरुग्ण तसेच कान-नाक-घसा संबंधीत दिव्यांग तपासणी बोर्डाचे शिबीर आयोजित केले जाते. मात्र, दि. ५ सप्टेंबर २०२५ (पहिला शुक्रवार) रोजी ईद-ए-मिलाद निमित्त शासकीय सुटी असल्यामुळे यावेळचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द करण्यात आले आहे.

नागरिकांनी त्या दिवशी रुग्णालयात दिव्यांग तपासणीस येऊ नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. नागरिक आले तरी झालेल्या गैरसोयीस जिल्हा प्रशासन जबाबदार राहणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### ईद-ए-मिलाद व गणेश विसर्जनाच्या दिवशी मद्य विक्रीवर बंदी जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश; उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई होणार

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यात आगामी ईद-ए-मिलाद, अनंत चतुर्दशी व गणेश विसर्जन या दिवशी कोरडा दिवस अर्थात मद्य विक्री बंदीचा आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केला आहे. महाराष्ट्र दारुबंदी कायद्याअंतर्गत जारी आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व देशी व विदेशी मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांची दुकाने बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

यानुषंगाने जिल्ह्यातील एफएल-२, एफएल-३, एफएल-४, एफएल/बीआर-२ व सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांना आपली दुकाने व मद्य विक्री केंद्रे संबंधित दिवशी बंद ठेवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाविरुद्ध कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

**या दिवशी राहणार कोरडा दिवस**

**५ सप्टेंबर २०२५ (शुक्रवार): ईद-ए-मिलाद निमित्त संपूर्ण दिवस दारूबंदी.**

**६ सप्टेंबर २०२५ (शनिवार): अनंत चर्तुदशीच्या दिवशी कायद्यानुसार दारूबंदी लागू.**

**७ व ८ सप्टेंबर २०२५: ज्या दिवशी व ठिकाणी गणेश विसर्जन होईल, त्या ठिकाणी विसर्जन सोहळा पूर्ण होईपर्यंत दारूबंदी राहणार आहे.**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक उत्सव काळात अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीवर देखील बारीक लक्ष ठेवावे, असे आदेशात नमूद केले आहे. याव्यतिरिक्त, संबंधित कार्यक्षेत्रात काही अनुचित घटना घडल्यास त्याबाबत संबंधित दुय्यम निरीक्षकांना थेट जबाबदार धरले जाईल, असा इशारा देखील अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी दिला आहे.

# बोहल्यावर चढवून लाखोंचा गंडा घालणारी टोळी गजाआड

## चाळीसगाव रोड पोलिसांची धडाकेबाज कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी:** लग्नाच्या आमिषाने तरुणांना फसवून त्यांच्याकडून लाखो रुपये उकळणाऱ्या एका टोळीचा पर्दाफाश चाळीसगाव रोड पोलिसांनी केला आहे. या टोळीने धुळे शहरातील एका तरुणाला लग्नाचे आमिष दाखवून बोहल्यावर चढवले, आणि नंतर त्याच्याकडून मोठी रक्कम उकळली. या प्रकरणाची तक्रार संबंधित तरुणाने चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात दिल्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सापळा रचून या टोळीचा भांडाफोड केला.

कारवाईचा तपशील:

पोलिस निरीक्षक सुरेश घुसर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. पोलिसांनी आरोपींवर पाळत ठेवल्यानंतर योग्य क्षणी सापळा रचत एजंटसह तीन महिलांना अटक केली आहे. हे सर्वजण ठराविक पद्धतीने तरुणांना लग्नासाठी तयार करत आणि नंतर विविध कारणांनी पैसे उकळत होते.

फसवणुकीची मोहीम:

एजंट मार्फत लग्नासाठी मुलगी दाखवली जात असे.

संबंधित तरुणाला मुलीशी भेट घालून दिली जाई.

नंतर लवकरात लवकर लग्न लावून देण्याचा दबाव आणला जाई.

लग्नाच्या नावाखाली सोने, कपडे, खर्च वगैरे कारणांनी पैसे उकळले जात.

एकदा लग्न झाले की मुलगी बेपत्ता होत असे किंवा तिच्या कुटुंबाकडून धमक्या येत.



आतापर्यंत अनेकांना गंडवले: अटक करण्यात आलेल्या आरोपींनी प्राथमिक चौकशीत कबूल केले आहे की त्यांनी याआधीही अनेक लग्नाळू तरुणांना अशाच पद्धतीने गंडवले आहे. सध्या पोलिसांकडून याप्रकरणी सखोल तपास सुरू असून, इतर काही पीडित तरुणांचेही नाव पुढे येण्याची शक्यता आहे.

पोलिसांचे आवाहन: पोलिस निरीक्षक सुरेश घुसर यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा प्रकारच्या फसवणूक टोळींपासून सावध राहा. कुठल्याही लग्न जुळवणी संदर्भातील व्यवहार करताना योग्य पार्श्वभूमी तपासा आणि संशयास्पद काही दिसल्यास तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधा.

ही कारवाई चाळीसगाव रोड पोलिसांसाठी मोठे यश मानले जात आहे आणि लग्नाच्या नावाखाली चालणाऱ्या फसवणुकीच्या प्रकारांना आळा बसवण्याच्या दृष्टीने हा एक मोठा टप्पा ठरला आहे.

## आडगाव राजा येथे जीवघेणे खड्डे बुजविण्यासाठी रामदास कहाळे यांचे आमरण उपोषण सुरु




दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या निष्क्रियतेमुळे ऐतिहासिक आडगाव राजा ते सावखेड तेजन या महत्त्वाच्या रस्त्यावर ''अपघातांचा सापळा'' बनला असून यामुळे शाळकरी विद्यार्थी, प्रवासी, व प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्ण यांना सातत्याने त्रास होत असून सदर खड्डे तात्काळ बुजविण्यात येवून डांबरीकरण निकृष्ट करणाऱ्या कंत्राटदार यांना काळया यादीत टाकण्यात येऊन शाखा अभियंता व गुणवत्ता नियंत्रक यांच्या वर कारवाई करण्यासाठी रामदास कहाळे यांनी आडगाव राजा येथे आज २ सप्टेंबर पासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

राष्ट्रमाता जिजाऊंच्या जन्म स्थळाजवळील अवघ्या १३ किमी अंतरावर असलेल्या राजे लखोजीराव जाधव यांच्या ऐतिहासिक आडगाव राजा नगरीकडे जाणारा हा मार्ग दररोज शेकडो लोकांच्या प्रवासाचा आधार असून, आता मोठ्या खड्ड्यांमुळे नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

बस वाहतूक, रुग्णांची ने-आण, शेकडो विद्यार्थ्यांचा प्रवास धोक्यात आडगाव राजा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याने रुग्णांना तातडीने सिंदखेड राजा येथे हलवावे लागते. त्याचप्रमाणे शेकडो विद्यार्थी दररोज हाच मार्ग वापरून शिक्षणासाठी जातात. शासकीय बससेवा तसेच खाजगी बस वाहतूक देखील याच घाटावरून सुरू असते. या प्रचंड खड्ड्यांमुळे कोणत्याही क्षणी भीषण अपघात होण्याची शक्यता आहे.

**पर्यटकांसाठी धोकादायक रस्ता!**

आडगाव राजा हे विदर्भातील एकमेव भुईकोट किल्ल्यासाठी तसेच प्राचीन हेमाडपंथी रेणुका देवी मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी दरवर्षी हजारो पर्यटक दाखल होतात. मात्र अशा पर्यटकांना आज खड्ड्यांनी भरलेला मार्ग आणि प्रशासनाचे नाकर्तेपण यांचा सामना करावा लागत आहे.

**निकृष्ट दर्जाच्या कामाचे बिंग फुटले!**

सावखेड तेजन नदीपासून घाटापर्यंत उन्हाळ्यात करण्यात आलेले डांबरीकरण पावसाळ्याच्या पहिल्याच सरींमध्ये उखडून निघाले आहे. काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने आज रस्ता खड्ड्यांनी विद्रूप झाला आहे. यासाठी जबाबदार असलेले शाखा अभियंता व गुणवत्ता नियंत्रक यांच्यावर तातडीने कारवाई करून त्यांच्या कडूनच या निकृष्ट कामाचा खर्च वसूल करण्याची मागणी रामदास कहाळे यांनी केली आहे

एकंदरीत, ऐतिहासिक वारसा लाभलेली आडगाव राजा नगरी आज खड्ड्यांच्या विळख्यात सापडली असून नागरिक, रुग्ण, विद्यार्थी आणि पर्यटक यांच्या जिवाशी खेळले जात आहे. प्रशासनाने वेळीच लक्ष न दिल्यास या घाटातील खड्डे कोणत्याही क्षणी भीषण दुर्घटनेला आमंत्रण देतील आणि त्याची जबाबदारी थेट शासनावर राहील अशी मागणी रामदास कहाळे यांनी केली आहे.

जर प्रशासनाने या खड्ड्यांत तातडीने दगड, मुरूम टाकून रस्त्याची डागडुजी केली नाही म्हणून २ सप्टेंबर पासून आमरण उपोषनास रामदास कहाळे यांनी सुरवात केली आहे. माजी सभापती विठ्ठल राठोड, माजी जिप सदस्य भगवान आघाव , शिव सेना नेते विलास विघ्ने, यावेळी सुलजगाव चे सरपंच संतोष किंगारे, वडाळी चे सरपंच सूर्यकांत काकडे, रामेश्वर काकडे, किशोर काकडे, यांच्या सह आडगाव राजा येथील सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती .

### राज्य महा उत्सव अंतर्गत स्पर्धा व पोर्टलला उदंड प्रतिसाद, सांस्कृतिक कार्यमंत्री यांचे अधिक सहभागाचे आवाहन

**मुंबई** : राज्यात साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवास २०२५ पासून राज्य उत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. या राज्य महाउत्सवांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचा या वर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला आहे. त्यामुळे यंदा जिल्हा व राज्यस्तरांसोबतच तालुकास्तरीय पारितोषिके देण्यात येणार आहेत. महाराष्ट्रभरातील ४०४ मंडळांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला असून स्पर्धेचे परीक्षण सहभागी तालुक्यांत सुरू आहे.

### ज्येष्ठ गौराईचे घरोघरी उत्साहात स्वागत



दैनिक आपला विदर्भ

■ केशव सातपुते

**किनगाव जट्टू** गणरायाच्या आगमनानंतर गावात साजऱ्या होणाऱ्या ज्येष्ठ गौराईच्या उत्सवाने संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि चैतन्यमय केले. रविवारी, दिनांक ३१ ऑगस्ट रोजी अनुराधा नक्षत्रावर गौराईचे सोनपावलांनी मंगलमय स्वागत करण्यात आले.

गौराई हे लक्ष्मीचे रूप मानले जाते. तिला आपल्या घरी आलेली माहेरवाशीण समजून पाहुणचार केला जातो. महिलांसाठी गौराईचे आगमन हा एक भावनिक आणि भक्तिभावाने भारलेला क्षण असतो. वर्षभर वाट पाहिलेल्या या दिवशी घरोघरी विशेष उत्साह पाहायला मिळाला.

गणेशोत्सवापाठोपाठ गौराईच्या आगमनाची लगबग घराघरात सुरू होते. स्वच्छता, रांगोळ्या, पारंपरिक सजावट, फुलांची आरास, नैवेद्य, आरती व गोडधोड जेवण यांची जय्यत तयारी करण्यात आली होती. गौराईच्या पूजनासाठी घरातील महिला पारंपरिक वेशात सजून सहभागी झाल्या होत्या.

सकाळी गौराईची स्थापना झाल्यानंतर संध्याकाळी आरती, ओवाळणी, स्त्रियांचे पारंपरिक गाणी आणि भजनाने वातावरण गूंजून गेले. गावात काही ठिकाणी महिला भजन मंडळांनी सादरीकरण केले. लहान मुलांनी फटाके फोडून आनंद साजरा केला.

गौराईचा मुक्काम हा दोन किंवा अडीच दिवसांचा असतो. स्त्रियांच्या डोळ्यांत अश्रू आणि आनंदाच्या साक्षीने गौराईला निरोप दिला जातो. हे दृश्य भक्तिभाव आणि जिव्हाळ्याचा संगम असतो.

गौराईचा हा पारंपरिक सण केवळ धार्मिक विधी न राहता, सामाजिक ऐक्य, कौटुंबिक बंध, आणि परंपरेचे स्मरण करून देणारा ठरतो.

गौराई उत्सव म्हणजे श्रद्धा, प्रेम, आणि नात्यांचा उत्सव. गावातील प्रत्येक घराने या पारंपरिक सणात आपुलकीने सहभागी होऊन संस्कृतीची शान जपली.

## सकल ओबीसी समाजाचं तीव्र आंदोलन गांधी चौकात मराठा आरक्षणाविरोधात जोरदार निदर्शने

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी:** चंद्रपूरच्या गांधी चौकात सकल ओबीसी समाजाच्या वतीने मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्याच्या हालचालींच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात आलं. ''आमच्या हक्कांवर कुणी डल्ला मारला, तर आम्ही गप्प बसणार नाही,'' असा निर्धार करत ओबीसी समाजाच्या विविध संघटनांनी रस्त्यावर उतरून सरकारच्या धोरणांवर आक्रमक नाराजी व्यक्त केली.

हे आंदोलन ओबीसी समाजाच्या विविध संघटनांच्या नेतृत्वाखाली पार पडले. आंदोलनादरम्यान, आंदोलकांनी घोषणाबाजी करत सरकारविरोधात आवाज उठवला आणि स्पष्ट मागणी केली की, मराठा समाजाला ओबीसी आरक्षणात समाविष्ट करू नये.

मागण्यांचा स्पष्ट स्वर आंदोलकांनी सांगितलं की, ''मराठा समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या प्रगत असून, त्यांना स्वतंत्रपणे आरक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना ओबीसी आरक्षणात समाविष्ट करणं हे मूळ ओबीसी समाजावर अन्याय करण्यासारखं आहे.'' या निर्णयामुळे ओबीसींच्या शैक्षणिक आणि नोकरीतील संधींवर परिणाम होईल, अशी भीती आंदोलक व्यक्त करत आहेत.

चंद्रपूर जिल्हा ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष अनिल डहाके यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''जर सरकारने मराठा समाजाला ओबीसीमध्ये समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला, तर आम्ही देखील आंदोलनाच्या उत्तरात आंदोलन करू. उपोषणाच्या उत्तरात उपोषण करू. आमच्या अधिकारांवर कुणी डल्ला मारला, तर गप्प बसणार नाही.'' ओबीसी समाजाच्या संघटनांनी इशारा दिला आहे की, सरकारने जर त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केलं, तर राज्यभरात आणखी तीव्र आंदोलन उभारलं जाईल. अनेक सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, आणि महिला यांचाही या आंदोलनात सक्रिय सहभाग दिसून आला.

गांधी चौकात झालेलं हे आंदोलन शांततेत पार पडलं असलं, तरी आंदोलकांचा रोष आणि असंतोष स्पष्टपणे जाणवला. यामुळे आगामी काळात राज्य सरकारवर दबाव




वाढण्याची शक्यता आहे.

अनिल डहाके, जिल्हा अध्यक्ष, ओबीसी सेवा संघ ''मराठा समाजाला ओबीसीमध्ये समाविष्ट करण्याचा प्रयत्न झाल्यास, आम्ही गप्प बसणार नाही. आमचं आरक्षण आमचं आहे यावर कुणीही हस्तक्षेप करू नये.''

वरील आंदोलन हा राज्यातील ओबीसी विरुद्ध मराठा आरक्षणाच्या वादाचा आणखी एक टप्पा ठरला आहे. सरकारकडून योग्य तोडगा निघेपर्यंत हा संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.